**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २० जून २०२५**

**ठळक बातम्या**

- **११व्या आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त आयोजित योगसंगमात नोंदणी करणाऱ्यांची संख्या १० लाखांच्या वर.**
- **सर्वत्र उद्या साजऱ्या होणाऱ्या योग दिनाचा उत्साह, नागपूरच्या यशवंत स्टेडियम मैदानावर मुख्य कार्यक्रम होणार.**
- **सौर कृषी पंपांच्या समस्या सोडविण्यासाठी महावितरणचा पुढाकार, शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध.**
- **पंढरपूर आषाढी एकादशी सोहळ्यासाठी मध्यरेल्वे तर्फे नागपूर- मिरज दरम्यान चार विशेष गाड्या.**

योग दिन-राष्ट्रीय, स्थानिक

११वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उद्या साजरा होणार आहे. योग दिनाची यंदाची संकल्पना 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग', ही असून, जी वैयक्तिक आरोग्य आणि जागतिक शाश्वततेला जोडते. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी योग प्रात्यक्षिक सादर करणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर योग दिन साजरा करण्यात येणार आहे. अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उद्या २१ जूनला साजरा होणार आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी योग प्रात्यक्षिकांमधे भाग घेणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर योग दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर इथं योग दिनाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम उद्या सकाळी बिबी का मकबरा परिसरात होणार आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी योग ही एक जीवनशैली आहे असं सांगत योगाभ्यासाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचं आवाहन केलं आहे.

***आयुष मंत्रालयाच्या वतीने मी आव्हान करतो की योगाला आपल्या जीवनाचा हिस्सा बनवा. आपल्या कुटुंबासोबत समाजासोबत योगाचा आनंद घ्या आणि पंतप्रधानांच्या फिट इंडिया आणि निरोगी भारत या संकल्पना साकार करूया. चला योगाच्या या यात्रेत सहभागी होऊन निरोगी आणि सशक्त भारत घडवूया.***

दरम्यान, उद्याच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश- विदेशातून नोंदणी करणाऱ्या योग अभ्यासकांची संख्या १० लाखांच्या पुढे गेली आहे. पतंजलि योगपीठ हरिद्वार च्या अंतर्गत पतंजलि योग समिति नागपुर जिल्हयाच्या वतीने २१ जून रोजी ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय क्रीडा चौक, हनुमान नगर येथे अंतर्राष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन पद्मश्री डॉ. विलास डांगरे, अध्यक्ष नरकेसरी प्रकाशन यांच्या प्रमुख उपस्थितीत २१ जून रोजी सकाळी 5.30 ते 8 पर्यंतच्या कालावधीत अंतर्राष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन राव यशपालजी आर्य, मुख्य संरक्षक,

भारत स्वाभिमान ट्रस्ट महाराष्ट्र (पूर्व) हे राहतील. विशेष अतिथि स्नेहलता आर्य, चंद्रशेखर खानखोजे, प्रदीप काटेकर, प्राचार्या शारदा नायडू यांची उपस्थितीत होणार आहे. VMVकॉलेज नागपूरच्या गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख, डॉ.सीमा पांडे यांनी योग आणि आहार यामुळे मिळणाऱ्या सुधृद जीवन यावर आकाशवाणी सोबत संवाद साधला आहे -

***योग ही केवळ एक व्यायामाची पद्धत नसून ती एक जीवनशैली आहे. योगाभ्यासामुळे शरीराची लवचिकता स्नायूंची ताकद श्वसन, संस्थेची कार्यक्षमता आणि मानसिक स्थैर्य वाढते. ज्ञान आणि प्राणायाम यामुळे तणाव चिंता आणि नैराश्य दूर होतात ज्यामुळे मनशांती आणि एकाग्रता मिळते. योग आणि आहार हे एकमेकांशी पूरक आहेत.हे दोन्ही निरोगी जीवनाचे दोन महत्वाचे आधारस्तंभ आहेत. अनेक संशोधनांनी सिद्ध केले आहे की जीवनशैली विषयक आजारांच्या प्रतिबंधासाठी आणि उपचारासाठी योग आणि संतुलित आहार हे दोन्ही अत्यंत परिणामकारक आहे. हे नियमितपणे जीवनशैलीत समाविष्ट केल्यास केवळ आजारांपासून संरक्षण होत नाही, तर संपूर्ण आरोग्य आणि आयुष्यमान सुधारते म्हणूनच नित्यनैमाने योग करा आणि संतुलित आहार घ्या.***

दरम्यान, आज नागपूर आकाशवाणी मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाचा दैनंदिन जीवनात अंतर्भाव करण्याबाबत शपथ घेण्यात आली. यावेळी अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपथित होते.

भक्तीयोग उपक्रम

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशभरात विविध संस्था संघटनाही सामूहिक योग प्रात्यक्षिकं सादर करणार आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या उद्या योग दिनी पुण्यात मुक्कामी आहेत. यानिमित्ताने राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य वारकरी भक्तीयोग उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, योग अभ्यासक असे साधारण दहा लाख लोक योगसाधना करणार आहेत.

'संयोग २०२५'

दरवर्षी २१ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर "एक पृथ्वी, आरोग्यासाठी योग" या संकल्पनेखाली 'संयोग २०२५' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन नुकताच नेहरू नगर बाग, नेहरू नगर झोन, सक्करदरा नागपूर येथे पार पडला हा कार्यक्रम आयुष मंत्रालय, केंद्रीय योग आणि निसर्गोपचार संशोधन परिषद, सूर्या फाउंडेशन आणि इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला.

योग

जागतिक योग दिनानिमित्त नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन नागपूर आणि केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने उद्या २१ जून रोजी सकाळी ६ वाजता धंतोली स्थित यशवंत स्टेडियम येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूलमंत्री तथा

नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह इतर मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

सौरकृषी

राज्यात विविध योजनांमध्ये बसविण्यात आलेल्या एकूण सौर कृषी पंपांची संख्या ५ लाख 65 हजारांवर पोहोचली असून महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. आणखी पाच लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. सौर कृषी पंप बसविल्यानंतर त्यात काही बिघाड होण्याच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला असून शेतकऱ्यांना घरबसल्या फोनवरून अथवा ऑनलाईन तक्रार करता येईल, अशी सुविधा उपलब्ध केली आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे. सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नाही, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

मालमत्ता कराचा भरणा

नागपूर महानगरपालिकेच्या मंगळवारी झोनतर्फे वॉर्ड क्रमांक ५८ मधील नागरिकांकरीता मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी २१ व २२ जून अर्थात उद्या आणि परवा दोन दिवसांचे शिबीर आयोजित केले आहे. जरीपटका भागातील साई वसंनशाह चौकात सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कर भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. या संधीचा या वॉर्डातील करदात्यांनी फायदा घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागातर्फे करण्यात आले आहे.

कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान

संयुक्त राष्ट्रांतर्फे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आज साजरं होत असलं, तरी भारताच्या मातीत हजारो वर्षांपासून सहकाराची भावना आहे. विश्वकल्याणाची भावना भारताच्या नसानसांत आहे आणि हाच सहकाराचा मंत्र आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज केलं. आंतरराष्ट्रीय सहकार्य वर्षाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रीय परिसंवादात ते आज मुंबईत बोलत होते.

नक्षल चकमक

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये आज झालेल्या चकमकीत एक महिला नक्षलवादी ठार झाली. कांकेर जिल्ह्यात आमाटोला आणि कालपर परिसरात नक्षलवादी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर जिल्हा राखीव रक्षक दल आणि सीमा सुरक्षा दलाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली असून, आजूबाजूच्या परिसरात शोध मोहीम सुरू असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षणसंस्था महामंडळ

राज्यातील विविध शैक्षणिक संस्था आणि संघटनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने, शिक्षणसंस्थांच्या मागण्यांकडे शासन हेतुपुरस्सर सातत्याने दुर्लक्ष करत असल्यामुळे येत्या, २३ जून २०२५ पासून शाळा सुरू न करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. या निर्णयाची माहिती महामंडळाचे सरकार्यवाह रविंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. नवीन शैक्षणिक सत्रात विदर्भातील शाळा सोमवार २३ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. परंतु, शिक्षणसंस्था महामंडळाच्या शाळा न सुरू करण्याचा निर्णय घेतला असून यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे आधीच कळविण्यात आले आहे, असे रविंद्र फडणवीस म्हणाले.

धरती आबा

धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत यवतमाळच्या पुसद तालुक्यातील हर्षी येथे विशेष जनजागृती कार्यक्रम व शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन शिबिरात एकून 139 नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. हर्षी येथील शिबीराचे उदघाटन पुसद तहसिलदार महादेव जोरवार व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पुसदचे प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांच्याहस्ते झाले.

आयआयएमसी

अमरावतीच्या भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) मध्ये मराठी पत्रकारिता डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांसाठी मंगळवार २४ जून रोजी थेट प्रवेश फेरी घेण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज गूगल फॉर्म द्वारे किंवा आयआयएमसीच्या अमरावती कार्यालयात येऊन भरता येईल.

चार विशेष गाड्या

पुढील महिन्यात ६ जुलै रोजी आषाढी एकादशी साजरा होणार आहे. या निमित्त पंढरपूर इथं होणाऱ्या सोहळ्या दरम्यान यात्रेकरूंची वाढती गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे नागपूर आणि मिरज दरम्यान चार विशेष गाड्या-गाडी क्र. 01205 आणि 01206 चालविण्यात येणार आहेत. या गाड्या ट्रेन ऑन डिमांड योजनेअंतर्गत चालविण्यात येतील. या दरम्यान अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड इथं गाडी थांबे घेईल.

*****